# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## चारकोप (कांदिवली (प.), मुंबई) परिसरातील कांदिवली औदयोगिक वसाहतीकरीता दिलेल्या भूखंडाचा बेकायदा व्यावसायिक वापर होत असल्याबाबत

**(१) ५३५० (१८-११-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चारकोप परिसरातील कांदिवली औद्योगिक वसाहतीकरीता दिलेल्या भूखंडाचा मूळ प्रयोजनाऐवजी मोठ्या प्रमाणात बेकायदा व्यावसायिक वापर केल्यामुळे कोट्यवधी रुपयांची मुद्रांक शुल्क व अनर्जित रकमेपोटी मिळणारा महसूल मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाला मुद्रांक शुल्क मिळणेकरीता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१) मुंबईतील चारकोप परिसरातील कांदिवली औद्योगिक वसाहतीमधील काही भूखंडधारकांनी विनापरवाना हस्तांतरण/वापरात बदल केल्याचे निदर्शनास आले आहे. काही प्रकरणात विनापरवाना हस्तांतरण, वापरात बदल होऊन शासनाच्या महसूलाची हानी झाल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाच्या निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २२/१२/२०२३ व दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला होता.

कांदिवली औद्योगिक वसाहतीमधील जमिनीचा ताबा व व्यवस्थापन कांदिवली को.ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट यांच्याकडे सन २००४ मध्ये देण्यात आले होते. तथापि, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा अहवाल विचारात घेऊन, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या बैठकीत कांदिवली औद्योगिक वसाहतीमधील जमिनीचा ताबा व जमिनीचे व्यवस्थापन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या नियंत्रणाखाली घेऊन, सदर जमिनीबाबत महसूल व वन विभागाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय, दिनांक ०८/१०/२०२४ रोजी निर्गमित झालेला आहे.

तथापि, या शासन निर्णयाविरूध्द कांदिवली को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रीयल इस्टेट लि. आणि इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (L) क्र.३२१९५ / २०२४ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२/१०/२०२४ रोजी स्थगिती आदेश दिलेला आहे. प्रकरणी शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे दिनांक १७/१२/२०२४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करून शासनाची बाजू मा.मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) मौजे चारकोप येथील औद्योगिक प्रयोजनासाठी कांदिवली को-ऑप. इंडस्ट्रिअल इस्टेट लि. या सोसायटीमधील आजरोजीपर्यंत किती विक्री / हस्तांतरण / गहाणखत व्यवहार नोंदणीकृत झाले आहेत व त्यापैकी किती दस्ताऐवजांमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांची परवानगी चे कागदपत्र सादर केलेले आहेत, याची माहिती सादर करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले होते. त्यानुषंगाने सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मुंबई उपनगर जिल्हा यांनी कांदिवली को-ऑप. इंडस्ट्रिअल इस्टेट लि. मधील सन २००२ ते आत्तापर्यंत नोंदणी झालेल्या दस्तांची माहिती सादर केली आहे.

तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांचेकडील पत्र दिनांक १९/११/२०२५ मध्ये सदरील भूखंडाच्या दस्तांची तपासणी केली असता मुद्रांक शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे, असे अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना कोरोना कर्तव्य सेवेतून वगळण्याबाबत

**(२) ९१९७ (१४-०६-२०२१) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने कोरोना प्रतिबंधासाठी शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित केल्या जात असून यामध्ये विनाअनुदानित शिक्षक, अंशतः अनुदानित शिक्षक तसेच वय ५० वर्षे पेक्षा जास्त असलेले शिक्षक व दुर्धर्म्य आजार असणाऱ्या शिक्षकांनाही कोरोना कर्तव्य सेवा लावण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षकांना कोरोना कर्तव्यामधून वगळणेबाबत त्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षकांना कोरोना कर्तव्यामधून वगळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) शिक्षकांना कोरोना कर्तव्यामधून वगळणेबाबतची मागणी कोरोना काळात होत होती. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५, भारतीय साथ रोग अधिनियम,१८९७ अंतर्गत कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रणाकरीता शिक्षकांच्या सेवा कोरोना योध्दा म्हणून घेण्यात आल्या होत्या. परंतु सदरची साथ नियंत्रणात आल्यानंतर शासनाने शाळा सुरु झाल्यामुळे अशा शिक्षकांना सदरच्या सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कायम विनाअनुदानित तत्त्वावरील महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(३) ९५१६ (२९-१०-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००१ नंतरच्या कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द वगळून टप्प्याटप्प्याने अनुदान देणेबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६/१२/२०२० रोजी शासनास पत्र पाठवून विनंती केली आहे, तसेच महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी मागील माहे जून ते सप्टेंबर, २०२० या कालावधीत घरबैठे धरणे आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात कायम विनाअनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी व नंतर मान्यता देण्यात आलेल्या उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांची एकूण संख्या किती व त्यामध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, उक्त सर्व कायम विनाअनुदानित तत्त्वावर सुरु असलेल्या महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कायम विनाअनुदानित तत्त्वावरील महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०६-२०२२) :** (१) हो खरे आहे.

(२) राज्यात कायम विना अनुदान धोरण स्विकारण्यापुर्वी १०८८ व नंतर मान्यता देण्यात आलेल्या २०२६ अशी एकूण ३११४ उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांची संख्या ४५५८७ आहे.

(३) कायम शब्द काढण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रशिक विद्यालय टोला (मांडवखाल)(ता.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया) येथील मुख्याध्यापकांच्या नियुक्ती/पदोन्नतीच्या गहाळ झालेल्या नस्तीची चौकशी करण्याबाबत

**(४) १०२०८ (०१-१०-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद गोंदिया कार्यालयाने माहे फेब्रुवारी/मार्च, २०१७ पासून बोगस नियुक्त्यांना मान्यता प्रदान करून लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केल्या प्रकरणी तसेच प्रशिक विद्यालय टोला (मांडवखाल) (ता.अर्जुनी/मोरगाव, जि.गोंदिया) या शाळेचे मुख्याध्यापक श्री.तुलाराम रामटेके यांच्या नियुक्ती / पदोन्नतीची नस्ती गहाळ केल्या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शासनाकडे दिनांक २८/१२/२०२० रोजी (शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांचेकडे) निवेदन देवून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०१-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी संबंधित मुख्याध्यापकाची वैयक्तिक मान्यता रद्द करण्यात आली असून, जबाबदार असणारे शिक्षणाधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कांदिवली (पश्चिम) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) १०९५७ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७०५ ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पश्चिम उपनगरातील गरीब, गरजू रुग्णांना लांब अंतरावरील केईएम व नायर रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत असल्यामुळे कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात केईएम व नायर रुग्णालयाच्या धर्तीवर सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मुंबई महानगरपालिकेला करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाच्या अद्ययावतीकरणाचा प्रस्ताव महानगरपालिकेने तयार केला आहे काय, तसेच सदर प्रस्तावाला मान्यता प्रदान केली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार या रुग्णालयाच्या अद्ययावतीकरणाच्या कामाला कधीपासून सुरुवात होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म.न.पा. रुग्णालयाच्या आवारातील रिकाम्या भूभागावर ३२५ रुग्णशय्या क्षमता असलेले सुपरस्पेशालिटी रुग्णालय प्रकल्पास मंजुरी प्राप्त झाली आहे.
(३) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म.न.पा. सर्वसाधारण रुग्णालयाच्या आवारातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या रिकाम्या भूभागावर एकूण ३२५ रुग्णशय्या क्षमतेच्या सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने नेफ्रोलॉजी, युरोलॉजी, प्लास्टीक सर्जरी, कार्डियोलॉजी, न्युरोलॉजी, हेमेटोलॉजी, एंडोक्रिनोलॉजी, गॅस्ट्रोएंटरोलॉजी, डायलेसिस सेंटर, कॅथलॅब अशा सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याचे योजिले आहे.

ह्या प्रकल्पाचे बांधकाम १६ नोव्हेंबर,२०२२ पासून सुरू झाले असून सदर बांधकाम ३६ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासनाने औषध विक्री संदर्भात राबविलेल्या मोहिमेबाबत

**(६) १२६४८ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १३ ते २० सप्टेंबर, २०२१ या काळात नोंदणीकृत औषध विक्रेत्यांच्या (फार्मासिस्ट) अनुपस्थितीत औषध विक्री विरुध्द मोहिम राबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोहिमेत औषधांची विक्री बंदीचे आणि परवाना रद्द करण्याची किती प्रकरणे आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर मोहिमेत २४६ किरकोळ औषध विक्रेत्यांना औषध विक्री बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत व ९४ औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द केले आहेत.

(३) दिनांक १३/०९/२०२१ ते दिनांक २०/०९/२०२१ या कालावधीत राज्यभर ३४६० किरकोळ औषध विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्यात. त्यापैकी २७७ ठिकाणी रजिस्टर्ड फार्मासिस्ट गैरहजर आढळून आले त्यापैकी २४६ औषध विक्रेत्यांना औषध विक्री बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्व २७७ किरकोळ औषध विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून त्याअनुषंगाने ९४ औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द व १३० औषध विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरपालिका व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळा करामधून वगळणेबाबत

**(७) १४०२३ (२५-०८-२०२२) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा कार्यरत असून सदरहू शाळांना आरटीई ॲक्ट लागू केला असून या शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळांना मोफत शिक्षण देत असल्याने या शाळांमधून कोणतेही उत्पन्न मिळत नसून सदरहू शाळांकडून नगरपालिका व महानगरपालिकेमार्फत लाखो रुपयांचा कर वसूल केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शाळांना करमधून सूट देणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ अन्वये मालमत्ता करातून सूट देण्याची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ चे नियम १० (२)

अन्वये कराच्या दराच्या निम्या दराने सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या स्तरावरून मालमत्ता करातून ५०% पर्यंत सूट देत असून नगरपालिका आपल्या अधिनिस्त शाळांना मालमत्ता करातून १००% सूट देतात.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १४३(१)(अ) व (२) मधील तरतुदीन्वये सार्वजनिक पूजेअर्चेसाठी किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी भोगवट्यात असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भागांश असलेल्या परंतु, ज्यापासून भाडे घेतले जात नाही व ज्यात फायदा मिळवण्यासाठी वापरण्यात येत नसलेल्या अथवा वापरण्याचा इरादा नसलेल्या खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असल्यास अशा मालमत्तांना सेवा कर वगळून आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर उर्वरीत करांना गुणवत्तेनुसार मालमत्ता करात सवलत देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील जिगांव प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याबाबत

**(८) १७०७९ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील जिगांव प्रकल्पांतर्गत गावांचे दोन वेळा पुनवर्सन होत असल्याने नुकसान भरपाई व पुनवर्सनाची कार्यवाही करण्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी तसेच बुलढाणा जिल्हा लोकतंत्र सेनानी संघाचे अध्यक्ष तथा स्वातंत्र्य सैनिकांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१९, दिनांक १२ सप्टेंबर, २०१९ व दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानेगांव गावातील कुटुंब धारकांना भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत नवीन कायदा २०१३ चे कलम ३९ नुसार तेवढीच अतिरिक्त नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी, अशी कायद्यात तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मानेगांव गावातील कुटुंबांना खास बाब म्हणून पुनर्वसनाची नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील)(२४-१२-२०२५) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सन १९८४-८५ मध्ये पुर्णा नदीला आलेल्या महापुरामुळे मौजे मानेगांव हे गाव बाधित झाल्याने या गावाचे पुनर्वसन महसूल विभागामार्फत प्रचलित तरतूदींप्रमाणे करण्यात आले होते. सदर पुनर्वसन हे राज्य प्रकल्पग्रस्त विस्थापितांचे अधिनियम अंतर्गत केलेले नाही. सद्य:स्थितीत मौजे मानेगांव ता.जळगांव जामोद जि.बुलढाणा हे जिगांव प्रकल्पांतर्गत बाधित असल्याने सदर गावाचे पुनर्वसन भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाईमिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये करण्यात येत आहे. जिगांव प्रकल्पांतर्गत बाधित असलेले मौजा मानेगांव या गावाचे भुसंपादनामुळे एकापेक्षा जास्त

वेळा विस्थापन झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. यास्तव भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ३९ नुसार या गावास अतिरिक्त नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मोठ्या प्रमाणात रस्ते अपघातांमध्ये मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढत असल्याबाबत

**(९) १८८९७ (२३-०६-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५७७६ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातात मोठ्या प्रमाणावर बळी जात असल्याने कठोर उपाययोजना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी राज्य रस्ते सुरक्षा परिषदेच्या माहे मार्च-एप्रिल २०२३ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या अतिक्रमणे, रस्ता सुरक्षा योजना, ब्लॅक स्पॉट कमी करणे याबाबतचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास माहे जानेवारी ते मार्च, २०२३ या ३ महिन्यात ३ हजार ५४८ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असून, दिवसाला विविध अपघातात सरासरी सुमारे ४० जणांचा मृत्यू होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यात मागील दोन वर्षात सुमारे ३ हजार पेक्षा अधिक बळी गेल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी अभियान राबविण्याबाबतचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिवसाला ४० हजारांहून अधिक नवीन वाहनांची भर पडत असून वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे अपघातांचे प्रमाणही वाढत असून मागील वर्षीच्या तुलनेत राज्यात अपघाताचे प्रमाण सध्या १३ टक्क्यांनी घटले असले तरी अपघातात बळी जाणाऱ्यांची संख्या चिंताजनक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपघातात बळींचे प्रमाण कमी करण्यासाठी व शुन्य अपघाताचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शहर व जिल्हा पातळीवर प्रत्यक्षात कोणत्या उपाययोजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, तसेच वाढत्या अपघातास जबाबदार धरून वाहतूक पोलीस, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी यांच्या कोणत्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री.प्रताप सरनाईक (११-०७-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) माहे जानेवारी, २०२३ ते मे, २०२३ या कालावधीत राज्यात एकूण १४,३४७ अपघात झाले असून त्यामध्ये ६,४३७ व्यक्तींचा मृत्यू झाला व १२,०७२ इतक्या व्यक्ती गंभीर जखमी झाल्या.

(४) याबाबत दरवर्षी शासनामार्फत राज्यात रस्ता सुरक्षा अभियान राबविण्याबाबत निर्देश देण्यात येतात. पोलीस विभाग, परिवहन विभाग व रस्ता सुरक्षा संबंधित विभागांमार्फत सदर अभियान राबविण्यात येते.
(५) राज्यात दिवसाला साधारण १२,५०० इतकी नवीन वाहने नोंदणी होतात. जानेवारी २०२२ ते मे २०२२ या कालावधीच्या तुलनेत जानेवारी २०२३ ते मे २०२३ या कालावधीत रस्ते अपघातांच्या संख्येत घट झाली आहे.
(६) राज्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत जिल्हा रस्ता सुरक्षा समितीमार्फत उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश दिले जातात. राज्यातील अपघातप्रवण स्थळ निश्चित करुन संबंधित रस्ते विभागामार्फत अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येत आहेत.

मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूकीस शिस्त लागावी तसेच अपघातांची संख्या कमी करण्यासाठी दिनांक ०१/१२/२०२२ पासून ६ महिन्यांकरीता विशेष तपासणी मोहीम २४/७ राबविण्यात आली. तसेच, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावरील वाहतूकीस शिस्त लावणे व अपघातांची संख्या कमी करणे याकरीता उपाययोजना करण्यात येत आहेत. तपासणी मोहिमेमध्ये वायुवेग पथकांमार्फत वाहतूकीस शिस्त लावणे, रस्ता सुरक्षा विषयक जागृती करणे, वाहनचालकांचे समुपदेशन करणे इत्यादी रस्ता सुरक्षा विषयक कार्ये करण्यात येतात.

जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत रस्ते सुरक्षेविषयक बाबींची तपासणी करण्यात येऊन दोषी वाहनधारकांवर कारवाई करण्यात येते.

---

## राज्य मार्ग परीवहन महामंडळाकडून जळगाव जिल्ह्यातील स्मार्टकार्ड पुरविणाऱ्या कंपनीचा करार वाढविणेबाबत

**(१०) १९२७० (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून जळगाव जिल्ह्यात सन २०१६ पासून स्मार्टकार्ड योजना सुरू करण्यात आली असून सन २०२२ पर्यंत ७१,४६० जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, पत्रकार, दलित मित्र,पुरस्कार प्राप्त व्यक्ती व रुग्ण यांना स्मार्टकार्डचे वाटप केलेले असून सध्या स्मार्ट कार्ड तयार करण्याचा करार संपला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीचा करार वाढविणेसंदर्भात तसेच दरवर्षी येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेकरीता जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून या करारास मुदतवाढ देणे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाकडून स्मार्टकार्ड योजना पुन्हा सुरु करण्याबाबत तसेच स्मार्टकार्ड पुरविणाऱ्या कंपनीचा करार वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१६-१२-२०२५) :** (१) होय.
(२) नाही.

(३) व (४) रा.प.महामंडळाव्दारे विविध सामाजिक घटकांतील सवलतीसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांस रा.प.बसेसमध्ये सवलतीकरीता स्मार्ट कार्ड (NCMC) देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात शाळा कॉलेजमध्ये पुस्तकांचे वितरण करण्याकरीता नेमलेल्या प्रतिनिधींनी जीवनदीप कंपनीची केलेली फसवणूक

**(११) २०४८७ (११-०८-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वेगवेगळया ३० शाळांच्या नावाने सुमारे ३९ लाखांची पुस्तके खरेदी करून जीवनदीप ऍ़ड मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या प्रसिध्द प्रकाशन कंपनीची फसवणूक करण्यात आल्याचे माहे मे २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवनदीप कंपनीच्या वतीने देशभरातील शाळा कॉलेजांमधील पुस्तकांचे वितरण, शाळा कॉलेजांमध्ये संपर्क, त्यांची मागणी याबाबत समन्वय ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर प्रतिनिधी नेमले असून चंद्रपूरच्या शाळांनी दिलेली रक्कमेचा जिल्हास्तरावर नेमलेल्या प्रतिनिधी यांनी स्वत:च अपहार केला असल्याने कंपनीने ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शाळांनी दिलेली रक्कमेचा अपहार करणाऱ्या जिल्हा स्तरावर नेमलेल्या संबंधित दोषी प्रतिनीधींनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मे.जीवनदीप कंपनीने तयार केलेल्या पुस्तकांची जाहिरात करून पुस्तकांची देशभरातील शाळांकडून ऑर्डर घेण्यात येत असून त्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यासाठी नियुक्त सेल्समन यांनी जीवनदीप कंपनीकडून शाळांच्या नावावर मागविलेली काही पुस्तके शाळेनी स्वीकारली व उर्वरीत पुस्तके ही त्याने खुल्या बाजारात विक्री करून त्याची रक्कम कंपनीत न भरता स्वत:च्या गरजेसाठी केला. याबाबत कंपनीने जिल्हास्तरावर नेमलेल्या दोषी प्रतिनिधींवर ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पास्थळ (जि.पालघर) येथे पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करणेबाबत

**(१२) २०८४१ (११-०७-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, तारापूर येथील मे. आय.व्ही.पी.ली., मे. लोबा केमिकल्स आणि मे. जि.एम. सेन्थेटीक्स या कंपन्यांकडून पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून मौजे पास्थळ (जि.पालघर) येथील पावसाळी नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असल्याची गंभीर बाब दिनांक २४ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकारामुळे परिसरातील शेतीवर व नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे हि खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली असता पाहणीत काय आढळून आले आहे आणि पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून मौजे पास्थळ येथील पावसाळी नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या मे. आय.व्ही.पी.ली., मे. लोबा केमिकल्स आणि मे. जि.एम. सेन्थेटीक्स या कंपन्यांवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०७-२०२३) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबत पास्थळ ग्रामस्थ यांची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तारापूर येथील कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.
(२) हे, खरे नाही.
(३) प्रश्नाधिन विषयाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या स्थळपाहणी दरम्यान मौजे पास्थळ येथील पावसाळी नाल्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर यांच्या औद्योगिक वसाहतीमधून निर्माण होणाऱ्या पावसाळी पाण्याचा (स्टॉर्म वॉटर) निचरा करताना आढळले. त्यामुळे मे. आय. व्ही. पी. लि. या उद्योगास पर्यावरण नियमांचे / संमती पत्रातील अटी शर्तींचे उल्लंघनाबाबत जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २३/०६/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मुंबईसह शाळांतील शालेय शुल्कावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(१३) २१०३५ (०९-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबईसह सर्व प्रकारच्या शाळांमधील शिक्षणशुल्कात वाढ करण्यात आल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण शुल्काच्या नावाखाली पालकांची लूट सुरु असून काही शाळा थकित शुल्कावर जास्त प्रमाणात व्याज घेत असून मुलांचे शालेय शुल्क थकल्यास त्यांना शिक्षा केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तदनुषंगाने शाळांतील शालेय शुल्कावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच शिक्षण शुल्काच्या नांवाखाली लुट करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम ६ अन्वये शाळा व्यवस्थापन विद्याविषयक वर्षाच्या प्रारंभाच्या किमान ६ महिने आधी कार्यकारी समितीकडे प्रस्तावित शुल्क मान्यतेसाठी सादर करण्यात येते. कार्यकारी समितीस ३० दिवसाच्या कालावधीत शुल्काच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार आहेत. मान्यता देताना कार्यकारी समिती नव्याने शुल्काची रक्कम निश्चित करू शकते. कार्यकारी समितीने मान्यता दिलेले शुल्क दोन विद्याविषयक वर्षासाठी बंधनकारक होते.

कार्यकारी समितीने ३० दिवसांच्या कालावधीत शुल्काच्या प्रस्तावास मान्यता न दिल्यास सदर बाब विभागीय शुल्क नियामक समितीच्या विचारार्थ सादर करण्याची व्यवस्थापनास मुभा आहे. विभागीय शुल्क नियामक समितीचा निर्णय अंतिम होईपर्यंत शाळा व्यवस्थापनाला मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क अधिक पंधरा टक्के एवढे शुल्क आकारण्याची मुभा आहे.

व्यवस्थापनाकडून ठरविण्यात आलेले शुल्क व कार्यकारी समितीने मान्यता दिलेले शुल्क या मध्ये १५ टक्क्यांपेक्षा अधीक तफावत असेल तर व्यवस्थापनास ३० दिवसाच्या कालावधीत विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपिल करता येईल. विभागीय शुल्क नियामक समितीच्या निर्णयाविरुध्द व्यवस्थापन किंवा कार्यकारी समितीस कलम ११ नुसार घटीत पुनरीक्षण समितीकडे अपील करता येते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सुमारे १५० संघटना माथाडींच्या नावाने अस्तित्वात असल्याबाबत

**(१४) २१६६६ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १५० संघटना माथाडी संघटनेच्या नावाने वावरत असल्याने अधिकृत नोंद असलेल्या व माथाडीसाठी कार्यरत असलेल्या माथाडी संघटना बदनाम होऊन बोगस संघटनामुळे माथाडी कामगारांच्या कामावर त्याचा परिणाम होत असल्याची बाब दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर बोगस संघटनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (११-०२-२०२६) :** (१) अशा स्वरूपाची निवेदने शासनास वेळोवेळी प्राप्त झालेली आहेत.

(२) श्रमिक संघ अधिनियम, १९२६ या कायद्याच्या कलम २१ अ नुसार एखादी व्यक्ती अपात्र ठरल्यास, मा.न्यायालयाने दोषी ठरवले असल्यास त्याला पदाधिकारी म्हणून काम पाहता येत नाही. तसेच त्यांना कामगार संघटनेचा पदाधिकारी म्हणून नोंदित करून घेण्यात येत नाही. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या चारित्र्य पडताळणीबाबत तपासणी करण्यात येते. कामगार संघटना अथवा पदाधिकारी यांचेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास माथाडी मंडळांमार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. कामाच्या ठिकाणी

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून विशिष्ट परिस्थिती उद्धवल्यास संबंधित माथाडी मंडळांमार्फत हस्तक्षेप करण्यात येऊन पोलिसांना तात्काळ कळविण्यात येते.
तसेच माथाडी कायद्याची परीणामकारक अंमलबजावणी करून त्यातील तरतूदींचा दुरूपयोग रोखण्यासाठी दिनांक ०६/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासनामार्फत कृती आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार मडळांमार्फत वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महापे (नवी मुंबई) येथील नैसर्गिक नाल्यावर मे. रूपा इन्फोटेक इन्फ्रास्ट्रक्चरल या कंपनीने नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१५) २१८०१ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवी मुंबई महापे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील नैसर्गिक नाल्यावर मे. रूपा इन्फोटेक इन्फ्रास्ट्रक्चरल या कंपनीने नियमांचे उल्लंघन करीत अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना निवेदन दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ मध्ये पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित करून ही अद्याप पर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची कारवाई करण्याची मागणी स्थानिक जनतेतून व लोकप्रतिनिधींकडून होऊनही अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई झाली नसल्याने याबाबत चौकशी अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१८-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ०६/१०/२०२३ रोजीचे पत्र मऔवि महामंडळास प्राप्त झालेले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
राज्यात नवी मुंबई महापे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील नैसर्गिक नाल्यावर मे.रुपा इन्फोटेक इन्फ्रास्ट्रक्चरल या कंपनीने नियमांचे उल्लंघन करीत अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३ मध्ये पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन माध्यमातून मुद्दा उपस्थित झाला होता.तसेच सदर प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेकडून सुध्दा त्यांचे दिनांक २५/०१/२०२३ च्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मऔवि महामंडळाचे उप अधियंता व सहाय्यक अभियंता तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर दिनांक २४/०२/२०२३ रोजी संयुक्त पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान असे निदर्शनास आले की, मे.रुपा इन्फोटेक इन्फ्रास्ट्रक्चरल प्रा.लि. यांनी मंजूर नकाशाप्रमाणे नाल्याचे बांधकाम केले असून, भूखंडामध्ये नाला प्रवेश करताना महापे गावाच्या रस्त्यावर पुर्वी बांधण्यात आलेल्या २.५०X१.५० मी. आकाराच्या स्लॅब ड्रेनपेक्षा सदर कंपनीने पार्किंगच्या इमारतीखालील आरसीसी नाल्याचा आकार २.८० X २.८० मी. इतका ठेवण्यात आला आहे.

त्यावरुन असे दिसून येते की, नाला इमारतीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी पेक्षा बाहेर निघतानाचा आकार जास्त ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा होण्याची शक्यता नाही. तसे उप अभियंता, मऔवि महामंडळ यांच्या दिनांक ०८/०५/२०२३ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, (कोपरखैरणे), नवी मुंबई महानगरपालिका यांना अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ७ हजार ४४२ गावांमध्ये सार्वजनिक स्मशानभूमी किंवा दफनभूमी नसल्याबाबत

**(१६) २१८०९ (०३-०१-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात काही गावातील स्मशानभूमीना आयएसओ मानांकन प्राप्त झाले तर मुंबईत पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्यात आलेली असताना दुसरीकडे राज्यातील तब्बल ७ हजार ४४२ गावांमध्ये सार्वजनिक स्मशानभूमी किंवा दफनभूमी नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विभागात ६२७, छत्रपती संभाजीनगर विभागात २९१३, अमरावती विभागात १२०२, नाशिक विभागात ५१२, कोकण विभागात १७६ आणि नागपूर विभागात २१४६ गावांमध्ये सार्वजनिक स्मशानभूमी नसल्याचे मा.महसूल मंत्री यांच्या आदेशानुसार विभागनिहाय केलेल्या पाहणी अहवालात स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने उक्त विभागात तातडीने सार्वजनिक स्मशानभूमी उभारण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध करून घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना जिल्हा परिषद स्तरावर निर्देश दिले आहेत. तसेच ज्या ठिकाणी खाजगी जागा आहे, अशा ठिकाणी संपादनाचे प्रस्ताव जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. काही जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा वार्षिक योजनेत स्मशानभूमीची कामे प्रस्तावित केली आहेत
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे येथील भिवंडीतील स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयातील विभाग डॉक्टरांअभावी बंद ठेवण्यात आल्याबाबत

**(१७) २१९९६ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सरकारी रुग्णालय व भिवंडीतील स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय या रुग्णालयातील काही विभाग डॉक्टरांअभावी बंद ठेवण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे शहरासह जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालयात पुरेशे डॉक्टर परिचारिका कर्मचारी आणि इतर संवर्गातील कर्मचारी तात्काळ देऊन रुग्णांना आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२०-०१-२०२६) :** (१) भिंवडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात, दंतशल्य चिकित्सक यांची बदली झाल्यामुळे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये दंत रुग्ण तपासणी काही कालावधीसाठी विस्कळीत झाली होती. परंतु जिल्हा रुग्णालय, ठाणे यांचेकडून दंतशल्यचिकित्सकांची सेवा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सद्य:स्थितीमध्ये नामनिर्देशनाने नियमित दंतशल्यचिकित्सक हजर झालेले असून दंत विभाग सुरु आहे. तसेच सद्य:स्थितीत सर्व विभाग कार्यान्वित आहेत.
(२) वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२३) ची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) ची १७२९ रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात दिनांक ३१/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यापैकी १४४६ इतक्या उमेदवारांचे नियुक्त आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच सेवा देण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे इतर रुग्णालयातून तात्पुरत्या स्वरुपात सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रक्तपेढ्यांमध्ये मिळणाऱ्या रक्त व त्याच्या घटकांची राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेकडून दर निश्चित करण्याबाबत

**(१८) २२४३३ (१९-०४-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रक्तपेढ्यांमध्ये मिळणाऱ्या रक्त व त्याच्या घटकांची राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेकडून दर निश्चित करण्यात येतात व त्या दरानुसारच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना रक्ताची विक्री करणे बंधनकारक असतानाही सन २०१४ ते २०१९ या सहा वर्षांमध्ये मुंबईतील रक्तपेढ्यांनी रुग्णांकडून रक्तासाठी निश्चित दरापेक्षा अधिक दर आकारून जवळपास १४ कोटी ७० लाख रुपयांचे अधिक रकमेची लुट केल्याचे माहे सप्टेंबर २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

रक्तकेंद्रे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेकडून निश्चित केलेल्या प्रक्रिया शुल्काच्या दराचे सर्वसाधारणपणे अनुपालन करतात.

तथापि, दिनाकं ०१/०७/२०१४ ते ३१/१२/२०१८ या कालावधीत मुंबईतील १९ रक्तकेंद्रांनी रक्त व रक्त घटाकांसाठी रुग्णांना जादा प्रक्रिया शुल्क आकारले असे निदर्शनास आले. सदर रक्तकेंद्रांची तपासणी करुन व सनदी लेखापालाकडून (CA) अंकेक्षण केल्यानंतर जादा प्रक्रिया शुल्काच्या २० टक्के एवढा दंड आकारण्यात आला आहे.

(२) मुंबईतील दोषी असणाऱ्या १९ रक्तकेंद्रांवर रक्त व रक्त घटकांसाठी रुग्णांना जादा प्रक्रीया शुल्क आकारल्याने सनदी लेखापालाकडून (CA) अंकेक्षण केल्यानंतर जादा प्रक्रीया शुल्काच्या २० टक्के एवढा दंड आकारण्यात आला आहे. यापोटी राज्य रक्त संक्रमण परिषदेने रुपये २,०४,९४,५४२/- (रुपये दोन कोटी चार लाख चौऱ्याण्णव हजार पाचशे बेचाळीस फक्त) एवढा दंड वसुल केलेला आहे.

(३) लागू नाही.

---

## राज्यातील अशासकीय शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) २३५८९ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अशासकीय शाळांमधील मार्च, २०२४ अखेर शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(२) असल्यास, ही रिक्त पदे भरण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-०२-२०२६) :** (१) व (२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण ८० टक्के मर्यादेत एकूण ३२,०१७ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार २३,८७१ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

मा.न्यायालयाने शिक्षकेतर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर करावयाच्या शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीबाबत आवश्यक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार या सूचनांबाबत यथोचित निर्णय होऊन सदरची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालाड (प), मुंबई येथील न्यू लिबर्टी सोसायटीच्या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(२०) २३९८७ (१६-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (प), मुंबई येथील न्यू लिबर्टी सोसायटीच्या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामाविषयी महानगरपालिकेकडे तक्रार करूनही पूर्णत: कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिकेने बांधकाम तोडण्याच्या कारवाईचे आश्वासन देउनही पालिका कारवाई करत नसल्याने संस्थेतील सदस्य उपोषण करणार असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा ही सोसायटीच्या नावावर असूनही या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यास महानगरपालिकेचे अधिकारी पाठीशी घालत असून याची सखोल चौकशी करून हे बांधकाम त्वरित जमीनदोस्त करावे अशी मागणी सदर संस्थेतील सदस्यांनी केल्याची बाब माहे मार्च,२०२४ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यू लिबर्टी सोसायटीच्या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

मालाड (प), मुंबई येथील न्यू लिबर्टी सोसायटीच्या जागेवर केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या पहिल्या मजल्याचे दिनांक ०५/०७/२०२३ रोजी निष्कासन करण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणात महापालिकेमार्फत अनधिकृत बांधकाम दिनांक ०५/०७/२०२३ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे. संस्थेकडून सदस्य उपोषण करणार असल्याचे कळविण्यात आलेले होते.

(३) सदर जागा ही सोसायटीच्या नावावर असूनही या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यास महानगरपालिकेचे अधिकारी पाठीशी घालत असून याची सखोल चौकशी करून हे बांधकाम त्वरित जमीनदोस्त करावे अशी मागणी सदर संस्थेतील सदस्यांनी केल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.

तथापि, सदर संस्थेच्या जागेवर अस्तीत्वात असलेल्या अनधिकृत बांधकामास महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटिस बजावून दिनांक ०५/०७/२०२३ रोजी सदर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामाच्या पहिल्या मजल्याचे निष्कासन करण्यात आले आहे.

तसेच, तत्कालीन स्थानिक खासदार श्री.गोपाल शेट्टी यांच्या विनंती पत्रानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नाहर नगर रोड ते लिबर्टी गार्डन रोड नंबर ४ येथील रस्ता रुंदीकरणाचे काम हाती

घेण्यात आले असून सदर रुंदीकरणात एकूण १० बांधकामे बाधित होत आहेत. उपरोक्त बाधित १० बांधकामांमध्ये सदर सोसायटीच्या जागेवरील बांधकामाचा देखील समावेश आहे. प्रस्तुत प्रकरणात रस्ता रुंदीकरणाची प्रक्रिया सुरू असून पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.